# आरोग्य सेवा संचालनालय

(महाराष्ट्र राज्य)

" आरोग्य भवन ", सेंट जॉर्जस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी | |
|---|---|---|
| | २२६२१०३१-३५ | Website : http://maha-arogya.gov.in |
| संचालक (वैयक्तिक ) | २२६२१००६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| सहसंचालक ( रुग्णालये-राज्यस्तर ) | २२६२१४७१ | Email : miscell@rediffmail.com |
| सहसंचालक ( प्रा.आ.केंद्र-जिपस्तर ) | २२६२०२४० | Fax No. 022-22621034 / 22620234 (DHS) |
| सहसंचालक ( असंसर्गजन्य रोग ) | २२६२२९८५ | 022- 22679044(Hosp.) |
| सहसंचालक ( खरेदी कक्ष ) | २२६२६२८२ | 022-22622155(CAO) |
| सहसंचालक ( अर्थ व आस्थापना ) | २२६२६९५५ | 022-22703785(Control Room) |
| | | 022-22621047 (NCD) |
| | | 022-22625799(Procurement Cell) |


## आदेश

क्र.संआसे/जन्म-मृत्यु/उपनिबंधक/कक्ष-२८/टे.३/न.क्र.३६/६८०७/

दिनांक - ९० /०६/२०११

प्रति

१) जिल्हा शल्य चिकित्सक
सामान्य रुग्णालय, .................... (सर्व)

२) वैद्यकिय अधिक्षक,
शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, ............... (सर्व)

३) अधिक्षक,
स्त्री रुग्णालय, व प्रसूतीगृह ................ (सर्व)

विषय - आरोग्य संस्थेत झालेल्या जन्म मृत्यू घटनेची नोंद करुन प्रमाणपत्र देणे वैद्यकिय अधिक्षक /अधिकारी यांना उपनिबंधक म्हणून प्राधिकृत करणेबाबत

संदर्भ - दि. ९ मार्च २०११ रोजी सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या बैठकीतील निर्णय

माता व बालक यांना संस्थेत मिळणाऱ्या इतर सेवाप्रमाणे जन्म प्रमाणपत्र संस्थेमार्फत त्वरित उपलब्ध व्हावे व दुबार जन्मनोंदणी टाळण्याच्या दृष्टीने प्रथम टप्यात सामान्य रुग्णालय, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व स्त्री रुग्णालय यांना उपनिबंधक जन्म व मृत्यु नेमण्याच्या सूचना मा. अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी केलेल्या आहेत. दि. ९ मार्च २०११ रोजी मा. आयुक्त, कुटुंब कल्याण तथा अभियान, संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये याबाबत अंतिम निर्णय घेण्यात आला आहे.

मुख्य निबंधक जन्म व मृत्यु तथा संचालक आरोग्य सेवा मुंबई यांना जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम ७(५) नुसार, प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन आपल्या संस्थेस १ जुलै २०११ पासून उपनिबंधक जन्म व मृत्यु कार्यालय असे घोषित करण्यात येत आहे. त्यानुसार आपल्या संस्थेतील व आपल्या अधिकारातील एका योग्य व्यक्तिची उपनिबंधक म्हणून नेमणूक करावी व त्याचा अहवाल उपसंचालक आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु, राज्य आरोग्य माहिती व [illegible] आकडेवारी केंद्र, पुणे यांना ७ दिवसाच्या आत पाठवावा.सदर उपनिबंधकांना या कामासाठी कोणतेही अतिरिक्त वेतन व भत्ते अथवा मानधन अदा करण्यात येणार नाही.

सदर नमणुकी अन्वये उपनिबंधक, जन्म व मृत्यु याना जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या तरतुदीनुसार, जन्म अहवाल नमुना क्र.१ भरुन त्यानंतर, जन्म प्रमाणपत्र नमुना क्र. ५ वितरीत करण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. परंतु मृत्यु प्रमाणपत्र वितरीत करण्याची व उपजत मृत्यु नोंदणीसंबधातील कार्यवाही निबंधक जन्म व मृत्यु यांचेकडूनच अपेक्षीत राहील. त्यामुळे मृत्यु अहवाल नमुना क्र.२, उपजतमृत्यु अहवाल नमुना क्र. ३ व मृत्यूच्या कारणाचे वैद्यकिय प्रमाणपत्र नमुना क्र. ४ पूर्वीप्रमाणेच निबंधक जन्म व मृत्यु यांचकडे प्रचलित पध्दतीनुसार, सादर करणे अपक्षीत राहील. यात बदल करण्यात आलेला नाही.

नियुक्त करण्यात आलेल्या सर्व उपनिबंधक यांना १ जुलै २०११ पूर्वी सविस्तर प्रशिक्षण व मार्गदर्शन उपसंचालक आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु, राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी केंद्र, पुणे कार्यालयामार्फत करण्यात येईल. व त्याबाबतच्या स्वतंत्र सूचना उपसंचालक आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु, राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी केंद्र, पुणे यांचे कार्यालयामार्फत देण्यात येतील.

संचालक आरोग्य सेवा
तथा मुख्य निबंधक, जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :-

१) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म व मृत्यु, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म व मृत्यु, महानगरपालिका ............ (सर्व)
३) मुख्याधिकारी तथा निबंधक जन्म व मृत्यु, नगरपरिषद,
(बीड/भंडारा/बुलढाणा/चंद्रपूर/गडचिरोली/गोंदिया/हिंगोली/जालना/लातूर/नंदूरबार/उस्मानाबाद/परभणी/रायगड/रत्नागिरी/सातारा/सिंधुदुर्ग/वर्धा/वाशिम/यवतमाळ)
४) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म व मृत्यु, जिल्हापरिषद, ............ (सर्व)
५) उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ ..... (सर्व)

प्रत पुढिल कार्यवाहीस्तव रवाना :- उपसंचालक, आरोग्य सेवा, (आमाजीआ), पुणे

प्रत सविनय सादर :- १) मा.अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२) मा.आयुक्त कुटुंब कल्याण तथा अभियान संचालक,एनआरएचएम., मुंबई